**अमरावती महानगरपालिका, अमरावती**
**दिनांक २१.११.२०२२ रोजी प्राप्त प्रशासकीय विषय**

**(प्रशासकीय विषय)**

**विषय क्रमांक ४५ :-** अमरावती शहराच्या मंजुर विकास योजना (सु.) मधील ६०.०० मी. रुंदीच्या अकोली वळण रस्त्याने बाधीत होणाऱ्या चमन नगर येथील विद्यमान गांव रस्त्या वरील व मनपा/शासकीय जागेवरील झोपडपट्टी धारकांना महानगरपालिका मालकीच्या मौजा बडनेरा सर्व्हे क्र. २७५ या जागे मधील पर्यायी भुखंड देणे बाबत.

**ठराव क्रमांक ४५ :-** अमरावती शहराच्या पश्चिम बाजुने जाणाऱ्या ६०.०० मी.डी.पी. अकोली वळण रस्त्याचे, बडनेरा येथील सुधारीत रेखांकनास शासन निर्णय क्र.टिपीएस/२८०६/२५३/प्र.क्र.१२४/०६नवि-३०, दिनांक २१/७/२००६ नुसार मंजुर आहेत. सुधारीत रेखांकनानुसार बाधीत होणाऱ्या मौजा बडनेरा स.क्र. २८०,३४० व ३४१ मधील एकुण १.४५ हे.आर. जागेचा भुसंपादन प्रस्ताव जिल्हा प्रशासना कडे सादर करण्यात आलेला आहे. सदर भुसंपादन प्रकरणी अंतिम निवाडा दिनांक १९/१०/२०२२ रोजीला पारित करण्यात आलेला आहे. निवाडा रक्कम महानगरपालिके कडुन जमा करण्यात आलेली आहे. सदर रस्त्याचे ८०% ते ८५% काम पुर्ण झालेले आहे.

अमरावती शहराच्या मंजुर विकास योजना (सु.) मधील ६०.०० मी. रुंदीच्या अकोली वळण रस्त्याने, बडनेरा चमन नगर येथील विद्यमान रस्ता व मनपा/शासकीय जागेवर ४६ झोपडपट्टी धारकांची घरे बाधीत होतात. उक्त झोपडपट्टी धारकांना महानगरपालिका मालकीच्या मौजा बडनेरा सर्व्हे क्र. २७५ या जागे मधील पर्यायी भुखंड देण्याचे प्रस्तावित आहे.

मौजा बडनेरा सर्व्हे क्र. २७५ मधील ०.८१ हे.आर. जागा महानगरपालिकेने खरेदी केलेली आहे. सदर जागा आज रोजी खुली असुन महानगरपालिकेच्या ताब्यात आहे. या जागेचा सुनियोजीत अभिन्यास तयार करुन, त्या मधील भुखंड देण्यात येणार आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९(ग) -आयुक्तास, महानगरपालिकेच्या मंजुरीने व राज्य शासनाच्या मान्यतेने, महानगरपालिकेच्या मालकीची जमिन, (पोट कलम दोन) महानगरपालिकेच्या कोणत्याही विकास योजनेच्या अंमलबजावणीच्या परिणामी बेघर झालेल्या व्यक्तीना देण्याचे नमुद आहे. सदर बाब पाहता महानगरपालिकेच्या मालकीच्या जागे मधील पर्यायी भुखंड देणे संबंधात सर्वसाधारण सभेची मंजुरी नंतर शासनाच्या मान्यते करीता प्रस्ताव सादर करण्यात येईल. उक्त प्रस्तावास मा.आयुक्त यांनी दिनांक २१/११/२०२२ रोजीला मंजुरी दिलेली आहे. उपरोक्त प्रशासकीय विषय सर्वसाधारण सभेच्या मंजुरी करीता सादर करण्यात आला आहे. परंतु, सद्यस्थितीत सर्वसाधारण सभा अस्तित्वात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासक यांना असल्याने सदर प्रशासकीय विषयास मंजुरी प्रदान करण्यात येत आहे.

ठराव मंजुर व कायम

| | |
|---|---|
| **स्वा/-** | **स्वा/-** |
| **नगरसचिव,** | **प्रशासक,** |
| **महानगरपालिका,अमरावती** | **महानगरपालिका,अमरावती** |

नगरसचिव
महानगरपालिका, अमरावती